**प्रेसनोट दि.१४/०७/२०१९**

**वानवडी पोलीस स्टेशन**

**स्पर्धा परीक्षेबद्दल दिव्यांग उमेदवारांना मार्गदर्शन**

पोलीस नेहमी समाजात मिसळून काम करतात. समाजाच्या सर्व घटकांमध्ये शांती व चांगल्या जीवनाची प्रेरणा असेल तर गुन्ह्यांना पायबंद तर बसतोच, शिवाय चांगले नागरिकही तयार होतात. यासाठी पोलीस अधिकारी वारंवार समाजातील वेगवेगळ्या घटकांमध्ये मिसळून मार्गदर्शन करतात.

दि. १२ जुलै २०१९ रोजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. क्रांतिकुमार पाटील यांनी अपंग कल्याणकारी शिक्षण संस्था, वानवडी येथे जाऊन चांगले शिक्षण व स्पर्धा परीक्षा यांबद्दल मार्गदर्शन केले.

तसेच पोलिसांची मदत लागल्यास त्यांना पोलीस स्टेशनचे व चौक्यांचे दूरध्वनी क्रमांक दिले. कोणत्याही अडचणीच्या वेळी पोलीस तुमच्या मदतीसाठी तत्पर आहेत असे पोलीस अधिकाऱ्याकडून ऐकल्यानंतर विद्यार्थ्यांना अधिक आत्मविश्वास वाटला. या कार्यक्रमाला संस्थेचे विद्यार्थी व पदाधिकारी उपस्थित होते.